**नि.दि.मु.क्र. १२०/२०१२**

**निशाणी क्र. ७६ खाली**

**प्रतिवादीतर्फे सा.क्र. १ चा शपथेवर साक्ष पुरावा –**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : गुलाब वसंत उगलमोगले

**उलटतपास वादीतर्फे वकिल श्री. के.डी. भोसले यांच्यामार्फत**

१२. मी दि. २५.०१.२०१० रोजीपासून गाव कामगार तलाठी म्हणून नोकरी करतो. मी कायमस्वरुपी नोकरी करतो. सध्या मी पळशी, ता. माण, जि. सातारा येथे नोकरी करीत आहे. दावा मिळकत माझ्या स्वत:च्या माहितीची आहे. दावा मिळकतीचा सर्व्हे क्र. ७३०/१अ असा असून त्याचे क्षेत्र २ हे. ७१आर एवढे आहे. त्या क्षेत्रात किती खरेदीदार आहेत व कोण–कोण आहेत, याची मला माहिती नाही. दाव्यातील वादी व प्रतिवादी क्र. २ हे ६ आर क्षेत्राचे खरेदीदार आहेत, हे मला माहित आहे. त्या क्षेत्राच्या चतु:सिमा दाव्यात नमुद आहेत. त्या क्षेत्राचा महसुल अभिलेख मी पाहिला आहे. त्याचे ७/१२ उता–याला वादी व प्रतिवादी क्र. २ यांच्या नावाची नोंद आहे व त्याचा फेरफार क्र. २३१०० असा आहे, हे मला माहित आहे.

१३. नियमाप्रमाणे एखादा नोंदणीकृत खरेदीचा दस्त असल्यास त्याची ७/१२ उता–याला नोंद घ्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी क्र. २ यांच्या नावाची नोंद खरेदीखतानुसार झालेली आहे. तशी नोंद घेतांना मालक सदरी खरेदीदाराचे नाव येते व वहिवाटदार म्हणून खुद्द असा शेरा येतो म्हणजेच मालक असल्याची व्यक्तीच वहिवाट करते असा शेरा असतो. आजपावेतो मी सुमारे १० हजाराच्या आसपास खरेदीखताच्या अनुषंगाने नोंदी केल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी क्र. २ हे खरेदीखताने मालक झाल्यामुळे त्यांची तशी नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याच कारणाने वहिवाटदार /भोगवाटदार म्हणून देखील नोंद झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ पाहून वादी व प्रतिवादी क्र. २ यांच्या

नावाची भोगवाटदार म्हणून खुद्द म्हणून नोंद झालेली आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, प्रत्यक्षात तशी परिस्थिती नाही.

१४. ७/१२ उता–याला खुद्द अशी नोंद असणे म्हणजेच मालक वहिवाटदार आहेत असे असते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, प्रत्यक्षात तशी परिस्थिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मालकाव्यतिरिक्त इतर कोणाची वहिवाट असल्यास त्यासाठी फॉर्म क्र. १४ भरणे अपेक्षित असते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, परंतू, सदर बाब शेतीसंदर्भात लागू असते. ति–हाईत इसमांची वहिवाट असल्यास त्याबाबतदेखील वहिवाटीची नोंद होत असते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, शेतीव्यतिरिक्त वापर असल्यास नगरपालिका अथवा ग्रामपंचायत नोंदी करीत असते. सदर दावा मिळकतीचा ७/१२ उतारा निशाणी ४७ पाहून सांगतो की, सदर मिळकत शेतीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, तोंडी कब्जा देणे कायदयात चालत नाही. दावा दाखल झाल्यानंतर दावा मिळकतीच्या बदलेल्या अभिलेखाबद्दल मला काहीशी माहिती आहे. माझ्या माहितीप्रमाणे फाळणी झाल्यानंतर ७/१२ चा क्रमांक बदलेला आहे. बदलेला सर्व्हे क्र. ७३०/अ/२ असा आहे. त्याचा फेरफार क्र. २३९५६ असा आहे व तो अभिलेखावर निशाणी ५१ प्रमाणे दाखल आहे. बदलेल्या क्षेत्राला देखील वादी व प्रतिवादी क्र. २ यांना खरेदी देणार यांची नोंद आहे. सदरची नोंद कोर्ट वाटपाच्या फाळणीबाराप्रमाणे झालेली नोंद आहे.

१५. वादी व प्रतिवादी क्र. २ यांच्या नावाची नोंद नगरपालिकेच्या अभिलेखात झाल्याबाबत दस्त निशाणी ४९ दिसत आहे. परंतू, साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ज्यावेळी सदर नोंद झाली ती सर्व्हे क्र. ७३०/१अ या जुन्या बंद झालेल्या ७/१२ उता–याला घाईगडबडीने करुन घेतली आहे. सन २०१२ नंतर जुना बंद झाला व नविन तयार झाला. सर्व्हे क्र. ७३०/१अ चा नविन क्रमांक ७३०/अ/२ असा आहे. हे मला माहित नाही की, वादीच्या नावाचे लाईट बील हे वादीने त्या जागेत विदयुत पुरवठा घेतल्याबाबत वादीकडे आहे. हे मला माहित नाही की, वादी सदर

मिळकतीबाबत नगरपंचायतीला सर्व कर व विदयुत देयके भरीत असतो. प्रतिवादी क्र. १ यांचा दावा मिळकतीवर ताबा आहे व तशी नोंद करावी असा आम्ही प्रयत्न केला होता. त्याबाबत अपील प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ यांच्या नावाची कब्जेदार असल्याबाबत नोंद नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ग्रामपंचायतीला आहे. आम्ही त्याबाबतचा दस्त दाखल करणेस तयार आहे. आम्ही त्याबाबतचा दस्त दाखल केले नाहीत, याचे कारण मला सांगता येत नाही. परंतू, तसा दस्त आवश्यक वाटल्यास दाखल करु.

१६. हे म्हणणे खरे आहे की, ताबा मिळाल्याबाबत माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझ्यासमक्ष तोंडी ताबा दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर केसशी माझा संबंध केवळ मला मुखत्यारपत्र दिल्यापासून आला. व्यवहाराला व व्यवहाराच्या दिवशी मी प्रत्यक्ष हजर होतो, हे दाखविणारा माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. कैफियत देतेवेळी मी स्वत: त्यावेळी हजर होतो असे मी माझ्या वकिलांना सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जो काही कब्जाबाबत नोंदीचा दस्त म्हणतो तसा दस्त अस्तित्वात नव्हता व त्यामुळे मी तसा दस्त दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ यांना मुळ मालक यांनी प्रत्यक्ष ताबा दिला हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही.

१७. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीसंदर्भात गहाणाचा व्यवहार झाल्याबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. प्रतिवादी क्र. १ यांच्यावतीने एक दिवाणी दावा क्र. १२२/२०२४ दाखल केल्याबाबत त्या दाव्याची प्रमाणित प्रत मी अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर दावा मिळकतीच्यासंदर्भात कोणाचा तरी गहाणाचा व्यवहार झाला अशी माहिती माझ्याकडे आहे. ती माहिती मुळ मालकाचे नाव बदलून खरेदीदाराचे नाव लागल्यामुळे मला मिळाली. हे म्हणणे खरे नाही की, मुळ

मालकांनी दावा मिळकतीचे खरेदीखत करुन दयावे अशी लेखी नोटीस आम्ही मुळ मालकांना दिलेली नाही.  तशी नोटीस दिल्याबाबत अभिलेख सादर करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, कथित साठेखताचा व्यवहार झालेला नाही व त्या व्यवहाराला मी कधीही हजर नव्हतो तरीही हजर होतो असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्र पान क्र. ४ वरील मजकूर की, वादी व प्रतिवादी क्र. २ यांच्या लाभातील खरेदीखत बेकायेदशीर व प्रत्यक्षात अस्तित्वात न येणारे व पोकळीस्त असल्याबाबत जो काही मजकुर लिहिला तो खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा ताबा आमच्याकडे आल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा आमच्याकडे नाही. दावा मिळकतीचा कब्जा मिळावा याबाबत आम्ही कुठेही प्रकरण दाखल केले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ताबा आमचाच आहे. हे म्हणणे खरे नाही की, साठेखत करुन दिले आहे व ताबा आमचा आहे असे आम्ही स्वार्थापोटी शपथपत्रात नमुद केले आहे. माझ्याकडे दावा मिळकतीचे खरेदीखत नाही. वडुज येथे जो काही दावा दाखल आहे त्याचे मुखत्यारपत्र माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुखत्यारपत्र मी कोणत्याही संयुक्तीक कारणांशिवाय घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास–पुर्ण.

फेरतपास–नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**(ग. दि. पाटील)**

दि. १९.०९.२०२४

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दहिवडी.